# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १०/०५/२०२६ (रविवार)

---

## घरफोडीची गुन्हा उघड, १ आरोपी अटक,
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

नागपुर ग्रमीण जिल्हयातील उघड न झालेलया गुन्हयांचा तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनिय बातमीदारामार्फत माहीती प्राप्त झाली की, **विकी उर्फ विडो रा. कामगार नगर, कामठी याने आपल्या साथीदारांसोबत सावनेर हद्दीत घरफोडी केली असून तो कन्हान येथे असल्याबाबत माहीती प्राप्त झाली.** मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने कन्हान पोलीसांसह संयुक्तरित्या आरोपीचा शोध घेत दिनांक ०९/०५/२०२६ रोजी **वकी उर्फ विडो राजू बोरकर, वय २७ वर्ष, रा. अंगुली नगर, बौद्धविरा जवळ, कामगार नगर, कामठी** ,याला कन्हान नगर पंचायत येथील दुर्गा माता मंदीराजवळुन ताब्यात घेतले. पोलीसांनी आरोपीकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता दिनांक ०७/०५/२०२६ रोजी सावनेर येथे घरफोडी केल्याची माहीती दिली. नमुद आरोपीला अटक करण्यात आली असुन पुढील तपास सावनेर पोलीस करीत आहेत.

उघडकीस आणलेला गुन्हा
१) पोस्टे सावनेर अप.क्रमांक ५१०/२६ कलम ३०५(अ),३४१(४) भान्यासं

# गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद,
# ५ जनावरांची सुटका, वडोदा पोलसांची कामगिरी

पोलीस स्टेशन वडोदाः— दिनांक ०९/०५/२०२६ रोजी वडोदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी परसोडी शिवार येथे नाकाबंदी केली असता बोलेरो पिकअप गाडी क्र एम एच.३६.एफ.१५९५ हे वाहन मिळुन आले.सदर वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली असता त्यामध्ये ५ गोवंश जनावरे ( १ गाय व ४ गोरे ) मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन अत्यंत निर्दयतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. आरोपी नामे १) चालक— अफसर अहमद खान, वय ४८ वर्षे रा.मोठा ताजबाग नागपुर, आणि त्याचे साथीदार आरोपी क्रं २) शेख इमान कुरेशी, वय ४५ वर्षे रा.मोठा ताजबाग नागपुर,३) बाबुराव अशोक ठाकरे वय ६५ वर्षे रा. आडका, ता. कामठी, जि. नागपुर हे मिळुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून १) ५ गोवंश जनावरे किंमती. ५०,०००/— रूपये २) बोलेरो पिकअप वाहन क्र एम एच. ३६. एफ. १५९५ किंमती. ४,००,०००/— रूपये असा एकुण ४,५०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. . नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन वडोदा येथे कलम ११(१) (ड), ११(१) (ई),११(१) (फ), प्राणी छळ प्रति. अधि.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# नागपूर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या ०९ आरोपीतांविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये ०९ गुन्हे नोंद

दिनांक ०९/०५/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयांतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध खालीलप्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत** आरोपी प्रमोद तेजराम पेरोडिया, वय ३८ वर्ष, रा. जामगाव फाटा, ता. नरखेड, जि. नागपुर हा मौजा जामगाव येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत** चंदु पुनिराम सेवतकर, वय ५४ वर्ष, रा. चारगाव, ता काटोल हा चारगाव बस स्टॉप येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन बेला** अंतर्गत बाबा शालीक कुंभरे, वय ४९ वर्ष, रा सोनेगाव लोधी, ता जि नागपुर हा मौजा सोनेगाव येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन पारशिवणी अंतर्गत** आरोपी परमेश पुंडलीकराव रेवतकर, वय ६१ वर्षे, रा.माताखेडी, खापा,ता.सावनेर जि.नागपुर हा मौजा नागठाणा मंदीर निंबा येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन मौदा** अंतर्गत क्रं १) माधव किसन देशमुख वय ५३ वर्षे रा. दहेगाव ता मौदा हा मौजा दहेगाव येथे आणि क्रं २) प्रफुल विलास गोमकर वय २५ वर्षे, रा. माथनी ता मौदा हा नाथनगर मौदा येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत** आरोपी क्रं १) तस्लीम अख्तर नसीम अख्तर वय ३८ वर्ष रा. नया गोदाम कामठी ता. कामठी हा रेल्वे पूल , हनुमान मंदिर कन्हान येथे क्रं २)गोपाल वानखेडे वय ३६ वर्ष रा. सुरेश नगर कन्हान हा कन्हान नदीकडे जाणारा रोडवर आणि क्रं आरोपी क्रं ३)आशिष ताराचंद मेंढे, य ३६ वर्ष, रा. पटेल नगर, कन्हान हा बी.के. सी.पी शाळा समोरील रोडवर आरोपी सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. नमुद ९ आरोपीतांवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ९ गुन्हे नोंद करण्यात आले आहे

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २७ गुन्हे नोंद

दिनांक ०९/०५/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू व साहित्य असा एकुण १,१४,२७०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण २७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

पोलीस स्टेशन केळवद येथे ३ गुन्हे नोंद, पोलीस स्टेशन खापा येथे ३ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन सावनेर येथे ०२ गुन्हे नोंद, पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३ गुन्हे नोंद.पोलीस स्टेशन वेलतुर येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन बोरी येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन बेला येथे २ गुन्हे नोंद, पोलीस स्टेशन जलालखेडा येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन नरखेड येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन काटोल येथे ३ गुन्हे नोंद, पोलीस स्टेशन अरोली येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन देवलापार येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन रामटेक येथे १ गुन्हा नोंद, पोलीस स्टेशन मौदा येथे ३ गुन्हे नोंद,पोलीस स्टेशन कन्हान येथे १ गुन्हा नोंद.

नमुद कारवाईत एकुण २०९ लिटर मोहाफुल गावठी दारू, २२०० लिटर मोहाफुल सडवा, ७२०० मिली देशी दारू असा एकुण १,१४,२७०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने